# संत गाडगे महाराज यांचे विचार : एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. शिंदे विकास विलासराव,** सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग, माऊली महाविद्यालय, वडाळा

ई मेल : shindevikas450@gmail.com, मो. नं . 9881256115

---

२० व्या शतकातील थोर समाजसुधारक डेबुजी झिंगराजी जाणोरकर म्हणजे महाराष्ट्राचे लोकप्रिय संत गाडगे बाबा म्हणजे मानवतेचा उद्गाता ! दलितांचा कैवारी ! दीनदुबळयांचा त्राता ! स्वच्छतेचा पुजारी ! महाराष्ट्र राज्यातील एक किर्तनकार संत समाजसुधारक, विदर्भाच्या मातीतुन जन्मास आलेला एक अनमोल हिरा होय.

वऱ्हाड प्रांतात अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव येथे २३ फेब्रु १८७६ रोजी गाडगे महाराजांचा जन्म परीट घराण्यातील वडील झिंगराजी व आई सखुबाई यांच्या पोटी जन्म झाला. गाडगे महाराजांचे पुर्ण नाव डेबुजी झिंगराजी जाणोरकर होते. झिंगराजीच्या आर्थिक परिस्थिती चांगली होती पण दारुच्या व्यसनहिनतेमुळे ते कर्जबाजारी झाले. व पुढील काळात त्यांचा मृत्यु झाला. पुढील काळात सखुबाईने शेणगाव हे गाव सोडले व आपले भाऊ चंद्रभाणजी यांच्याकडे दापुरे गावात राहू लागल्या. मामाच्या घरी राहत असताना डेबुजीने गुरे ही राखण्यास सुरुवात केली व त्या वेळी त्यांना भजनाची आवड निर्माण झाली. पुढील काळात मसापुरच्या धनाजी खल्लारकरांची कन्या कुंताबाई यांच्याबरोबर डेबुजीचा विवाह झाला. डेबुजीने सावकारांच्या कर्जातुन मुक्तता होण्यासाठी चांगल्या प्रकारची शेती केली. संसारात असताना डेबुजींनी समाजातील रुढी, परंपरा, धर्म व कर्मकांड यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यातून पुढील काही काळात डेबुजींचे संसारात मन रमण्याऐवजी ते विरक्ताच्या मार्गाकडे झुकू लागले. मानवी जीवनातील दु:ख, दैव, अनिश्चितता व जीवनातील प्रश्नांचा शोध घेण्यास त्यांनी सुरुवात केली. जगाचा संसार सुखी करण्यासाठी डेबुजींनी घर सोडले. व पुढील काळात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या प्रदेशात भटकंती करुन जगाला किर्तनाच्या माध्यमातून आपले विचार उपदेश व चिंतन करण्यास लावले.

***किर्तनाच्या माध्यमातून लोकजागृती :-**

संत गाडगे महाराज संसारिक जिवनातून विरक्त हाऊन परमार्थिक मार्गाकडे वळलेले संत पुरुष होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ठ रुढी परंपरा व धर्म इत्यादीतील दोष दूर करण्यासाठी खेड्यापाड्यातील देव भोळ्या जनतेला भजन व किर्तनासारख्या गोष्टीचे विशेष आकर्षण वाटत असत. त्यामुळे या जनतेपर्यंत पोहचण्याचा प्रभावी मार्ग आहे. गाडगे महाराजांचे किर्तन हा एक लोकविलक्षण अनुभव असे. त्यांचे किर्तन म्हणजे श्रोत्याशी चाललेला एक प्रकारचा सुखसंवादच गाडगे महाराज आपल्या किर्तनात श्रोत्यांनाच निरनिराळे प्रश्न विचारुन त्यांना त्यांचे अज्ञान, दुर्गुण व दोष यांची जाणीव करुन देत असत. गाडगे महारांना शिक्षणाचा गंध किंवा उभ्या आयुष्यात त्यांनी शाळेचे तोंडही पाहिले नव्हते परंतू त्यांनी समाज व्यवहारीक डोळयांनी अनुभवला व निरीक्षणातून अचूक वेध घेऊन त्यांनी आपले विचार किर्तनाच्या माध्यमातून समाजापूढे मांडले.

***गाडगे महाराजांचे किर्तनातील विचार :-**

गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनातून “भुकेलेल्याना जेवण, तहानलेल्यांना पाणी, उघड्यांना वस्त्र, गरीब मुला मुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा, अंधपंगू रोग्यांना औषधोपचार, बेकारांना काम, पशुपक्षी मुक्याप्राण्यांना अभय, दु:खी व निराशांना हिंमत हा संदेश दिला ”. गाडगे महारांचे किर्तनाच्या माध्यमातून वेगळेपण पुढील गोष्टीवरुन दिसून येते.

***देवा विषयी विचार व उपदेश :-**

अखिल विश्व निर्माण करणारा आणि ते सुयंत्र चालविणारा कुणीतरी असावा, त्याला देव म्हणा किंवा परमेश्वर म्हणा. पण देव चार हातांचा, भक्तांना दर्शन देतो. साक्षात्कार होतो. मदतीला धावून येतो या गोष्टी थोतांड आहेत. असे बाबा सिद्धांत सांगतात. स्वत:ची बुवाबाजी माजविण्यासाठी या थोतांडाचा मतलबी लोक मोठा व्यापार करतात. त्यापासून समाजाने किंवा शहाण्याने सावध असावे. ईश्वर हा एक आहे. तो कोणत्याही मुर्तीत नाही.

एका तोंडाने म्हणायचे का ? देवाने आपणा सगळयांना व जगाला निर्माण केले. आणि गावोगाव पहावे तर दगडांना शेंदूर फासून हजारो लाखो देव तयार करण्याचा कारखाना या समाजाने निर्माण केला आहे. देव कोणाच्याही

नवसाला पावत नाही. जर देव नवसाला पावत असेल तर जगात कष्ट, मेहनत शेती करण्याची आवश्यकता आहे का ? हा तर लबाडांचा धंदा आहे असे गाडगे महाराज म्हणतात.

देवाला प्रसन्न करण्यासाठी पुजा, अर्चा, व्रतवैकल्य, सत्यनारायण, पैसे टाकणे, फळे वाटणे या वस्तूंची नाही. ' देव हा भक्ती शिवाय कशाचाही भुकेला नाही.' भक्तीभावाने केलेला एक नमस्कारातच देव खुश असतो. म्हणून सांगतो की, देवा पुढे पैसे, फळे, पुजाअर्चा किंवा नवस करण्याची आवश्यकता नाही. तसेच नवस फेडण्यासाठी सावकारी कर्ज काढून देव धर्म करु नका. नवस करुन देव कोणालाही पावत नाही असे गाडगे महाराज सांगतात.

गाडगे महाराज सांगतात की, देव कोणाच्याही अंगात आला नाही, येत नाही आणि येणार नाही. तुम्हा आम्हाला देवाच्या रंग रुपाचा नाद किंवा ठाव ठिकाणा माहित नाही. असा देव माणसाच्या अंगात येईलच कसा ? अंगात देव आल्याचे सोंग करणाऱ्या घुंमणाऱ्यांना चांगला धडा शिकविला पाहिजे हा संदेश ते देतात.

देवाला प्रसन्न करण्यासाठी कोंबड्या, बकरी व रेड्यांची हत्या करण्याची गरज नाही. देवाला बळी देण्यासाठी मुक्या प्राण्यांची हत्या करु नका. माणसाने स्वत:च्या आशा विविध प्रथा निर्माण केल्या आहेत. त्यामुळे तुम्ही हिंसा करु नका असा अट्टाहास बाबांनी धरला आहे.

***सामाजिक विचार व उपदेश :-**

गाडगे महाराज यांनी समाजात असणाऱ्या रुढी, परंपरा, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अंधश्रद्धा निर्मुलन आपले विचार किर्तनातून सांगितले आहेत. समाजामध्ये जातिभेद पाळू नका. माणसाने एकमेकांशी व्यवहार करताना प्रेमाने व बंधुभावाने करावा. समाजातील जाती जमाती मध्ये स्पृश्य अस्पृश्य ही संकल्पना मानू नका. कारण मनुष्य प्राणी सर्व ईश्वराची लेकरे आहेत. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी जादूटोणा व चमत्कार यावर विश्वास ठेवू नका. कारण " माणूस हाच एक मोठा चमत्कार आहे." त्यातल्यात्यात कष्ट मेहनत करुन जमिनीतून अन्नाचे सोने काढणारा शेतकरी उपाशी मरतोच कसा ? हा प्रश्न बाबांनी चमत्कार या विषयी विचारतात. समाजातील रंजल्या गांजल्यांना मदत व सेवा करा असाही उपदेश गाडगे बाबांनी केला आहे.

***शिक्षणाबाबत विचार व उपदेश :-**

गाडगे महाराज स्वत: निरक्षर होते तरीही ते हाडाचे शिक्षक व शिक्षण प्रसारक होते. त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून लोक शिक्षण दिले. लोकांना आपल्या मुलाबाळांना शिकावयाला प्रवृत्त केले. शिक्षण हे गरीबापर्यंत पोहचले पाहिजे असाही दृष्टीकोन त्यांचा होता. व्यवहारात यशस्वी होण्यासाठी काटकसर व हिशोबपणा आवश्यक आहे. गरिब माणूस हा दोन्हीही गोष्टी करीत नाही. त्यामुळे तो गरीब राहतो. त्यासाठी शिक्षणाची गरज आहे. म्हणून पालकांना मुलांना शिक्षण देण्याचा उपदेश बाबा करतात. ' दोन घास कमी खा, पण पोरांना शाळा शिवका.' तसेच शिक्षणाविषयी कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब यांच्या विषयी बाबांना आदर वाटतो. कारण लोकांना शहाणं बनविण्यासाठी यांनी शिक्षणाची गंगा निर्माण केली. सण उत्सव यावर पैसा न खर्च करता शिक्षणावर खर्च करा असा बाबा शिक्षणाचा आग्रह धरतात.

***स्वच्छते विषयी विचार व उपदेश :-**

गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनातून स्वच्छता या विषयावर भर दिला. बाबांनी आपला स्वतंत्र ' खराटा ' संप्रदाय निर्माण केला होता. खराट्याने घरातला, दारातला, नी गावातला नुसता केरकचरा काढला नाही तर त्यांनी जुने विचार झाडून माणसाची मने स्वच्छ करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. बाबा ज्या ठिकाणी किर्तनाला जात त्याठिकाणी प्रथम सर्व परिसर स्वच्छ करीत. त्यामुळे आधी केले त्यानंतर लोकांना सांगितले हे तत्वज्ञान बाबांनी स्वच्छते विषयी समाजाच्या मनावर बिंबवले.

***गाडगे महाराजांचे इतर विचार :-**

गाडगे महाराजांनी किर्तनाच्या माध्यमातून अनेक विषयाला स्पर्श केलेला दिसतो. त्यामध्ये ते सांगतात दारु पिऊ नका त्यामुळे समाजाची व गुटुंबाची हानी होते. तसेच कर्ज काढून कोणताही सण उत्सव साजरा करु नका. तसेच देवऋषी, बुवा यांच्या नादी लागू नका. तसेच चोरी करु नका. तसेच गोर गरीबांनी मदत व त्यांची सेवा करा. जे

अनाथ अपंग आहेत अशांना अन्नदान करा. तसेच भूतदया म्हणजे परमेश्वराची पुजा करा. माणसाला संसारात राहूनही देवभक्ती करता येते. जन सेवा हिच ईश्वर सेवा आहे. म्हणून प्रत्येक माणसाने नैतिकता व मानवता याचा स्विकार करा. असा उपदेश बाबांनी केला होता.

गाडगे महाराजांनी अथांग मानवजातीची सेवा केली. पण त्यांनी आपली गादी किंवा मठ स्थापन केला नाही. इतकेच काय पण त्यांनी कोणाला आपल्या पायाही पडू दिले नाही. ते म्हणतात " संत तुकाराम महाराज हे माझे गुरु, माझा शिष्य कोणीही नाही." गाडगे महाराजांनी लाकजागृती व समाज देवतेचे व्रत स्विकारुन किर्तनाच्या माध्यमातून समाजाचे चिंतन करुन वास्वविकतेचा संदेश समाजाला गाडगे महाराजांनी आपल्या किर्तनातून दिलेला दिसतो.

**निष्कर्ष :-** संत गाडगे महाराजांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती अनिष्ट रूढी – परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी किर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. समाजाला विविध विचारातून वैज्ञानिक दृष्टीकोन मांडून समाजामध्ये जनजागृती निर्माण केली व आयुष्यभर स्वच्छतेचा मार्ग गावाला दाखविला.

***संदर्भ ग्रंथ :-**

1. श्री संत गाडगेबाबा :- प्रबोधनकार के. सी. ठाकरे
2. कर्मयोगी गाडगेबाबा :- मनोज तायडे
3. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास :- डॉ. भिडे - पाटील
4. श्री गाडगे महाराज :-गोपाल निलकंठ दांडेकर
5. महाराष्ट्रातील समाजसुधारक :- के. सागर
6. प्रबोधन पंढरीचा क्रांतीकारक संत – गाडगेबाबा :- संतोष अरसोड
7. संत सुधारक व त्यांचे धर्म विचार एक अभ्यास :- रा. ना. चव्हाण
8. असे होते गाडगेबाबा :- प्राचार्य रा.तु. भगत
9. लोकोत्तर : गाडगेबाबा जीवन व कार्य :- डॉ. द.ता. भोसले